नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : २५५ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com








महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

# समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे    POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026








सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक


## थोडक्यात...



### जलजीवन मिशनचा खर्च वाढला

मुंबई (स. गांवकरी) : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या जलजीवन मिशनचा राज्यातील खर्च वाढत चालला आहे. एकीकडे अपूर्ण कामांवरून कॅगने ताशेरे ओढले असतानाच या योजनेचा खर्च तीन हजार कोटींनी वाढला आहे. चुकलेले नियोजन, सर्वेक्षणातील त्रुटी, अंमलबजावणीतील विलंब आणि योजनेतील बदलामुळे या योजनेचा एकीकडे खर्च दुप्पटीहून अधिक वाढला आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सादर झालेल्या कॅगच्या अहवालात जलजीवन मिशनचा खर्च दुप्पट झाला पण तरीही कामे अपूर्ण असल्याचे ठपका ठेवला आहे. तर दुसरीकडे तीन जिल्ह्यातील तेरा योजनांचा खर्च तीन हजार कोटी रुपयांनी वाढला आहे.

### आंदोलनकर्त्यांशी मुख्यमंत्र्यांचा संवाद

मुंबई (स. गांवकरी) : आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांसंदर्भात कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्याचे तसेच अनुदानित आणि शासकीय आश्रमशाळांमधील गैरसोयीबाबत त्रयस्थ संस्थेमार्फत (थर्ड पार्टी ऑडिट) पाहणी करून कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी शनिवारी दिली. आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्या मान्य झाल्याने आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांनी उपोषण आंदोलन मागे घ्यावे, असे आवाहन उईके यांनी केले आहे. पुणे, नाशिक आणि नागपूर येथील आदिवासी विद्यार्थ्यांनी गेल्या १७ दिवसांपासून आपल्या मागण्यांसाठी उपोषण आंदोलन सुरू केले होते. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या पुण्यात पार पडलेल्या कार्यक्रमात आदिवासी विद्यार्थ्यांनी आपल्या समस्यांना वाचा फोडली होती. विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन राहुल गांधी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिले होते. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी शनिवारी वर्षा निवासस्थानी विभागाचे अधिकारी आणि आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांबरोबर बैठक घेतली.

### बसभाडे चार ते पाच हजार रुपये

मुंबई (स. गांवकरी) : गणेशोत्सवानिमित्त कोकणात जाणाऱ्या मुंबई परिसरातील नोकरदारांची धावपळ सुरू झाली आहे. रेल्वेच्या विशेष गाड्यांचे आरक्षण संपल्याने आता एसटी आणि खासगी बसशिवाय पर्याय नाही. मात्र खासगी बसच्या प्रवासासाठी प्रत्येकी ४ ते ५ हजार रुपये मोजावे लागणार आहेत. दरवर्षी कोकणात गणपतीसाठी मुंबई महानगर क्षेत्रातून सुमारे १२ ते १३ लाख जण जातात. सुमारे तीन ते साडेतीन हजार खासगी बसेस धावतात. प्रवाशांची गर्दी लक्षात घेता बसच्या तिकिटात भरमसाट वाढ करण्यात आली आहे. हंगामात एसटी तिकिटाच्या दीडपट दरवाढ करण्याची खासगी ट्रॅव्हल्स बसला मंजुरी आहे. मात्र प्रत्यक्षात तिकीट दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. एरवी एक हजारांचे असणारे तिकीट आता ४ ते ५ हजारांच्या घरात पोहोचले आहे. नोकरदारांच्या सोयीसाठी विशेष गाड्या चालविण्यात येतात. यंदा मुंबईहून सुटणाऱ्या विशेष रेल्वे गाड्यांमध्ये १ लाख १३ हजार ४२८ प्रवाशांनी तिकीट आरक्षित केले असून यातून रेल्वेला ७.७७ कोटी रुपये महसूल मिळाला. मध्य रेल्वे २७ ऑगस्ट ते २६ सप्टेंबरदरम्यान २०० विशेष आरक्षित आणि ६२ अनारक्षित फेऱ्या चालवणार आहे.



# राज्यातील आणखी एक परीक्षा रद्द!

## गोंधळाच्या तक्रारींनंतर उच्च न्यायालयाचा निर्णय; लिपीक भरतीची टायपिंग परीक्षा पुन्हा कधी होणार?

मुंबई : (स. गांवकरी)

उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे राज्यातील हजारो उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे. भरती प्रक्रियेत पारदर्शकता आणि उच्च दर्जाचे निकष कायम ठेवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने राज्यातील लिपीक भरती प्रक्रियेतील टायपिंग परीक्षेसंदर्भात एक अत्यंत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. परीक्षा केंद्रांवर झालेला तांत्रिक गोंधळ आणि उमेदवारांच्या आंदोलनानंतर १६ ऑगस्ट रोजी झालेली टायपिंग परीक्षा पूर्णपणे रद्द करण्यात आली असून, ही परीक्षा आता नव्याने घेतली जाणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आस्थापनेवरील १,३६२ लिपीक पदांच्या भरतीसाठी ही प्रक्रिया राबवली जात आहे. यामध्ये मुंबई मुख्य पीठासाठी ८३०, नागपूर खंडपीठासाठी १६६ आणि छत्रपती संभाजीनगर खंडपीठासाठी ३६६ पदांचा समावेश आहे. सुमारे १३ हजार उमेदवार या परीक्षेसाठी पात्र ठरले होते. १६ ऑगस्ट रोजी घेतलेल्या टायपिंग परीक्षेदरम्यान राज्यातील अनेक केंद्रांवर प्रचंड तांत्रिक सावळागोंधळ पाहायला मिळाला. सर्व्हर डाऊन होणे, हार्डवेअरमधील बिघाड, सॉफ्टवेअरची संथ गती, परीक्षा सुरू असतानाच सिस्टीम अचानक लॉगआऊट होणे आणि वेगवेगळ्या वेळी परीक्षा सुरू होणे, अशा गंभीर समस्यांना उमेदवारांना सामोरे जावे लागले. या तांत्रिक अडचणींमुळे टायपिंगच्या वेगावर आणि कामगिरीवर थेट परिणाम झाला.

### उच्च न्यायालयाचा मोठा निर्णय

सुरुवातीला या तांत्रिक त्रुटींची तपासणी केली जाईल असे प्रशासनाने म्हटले होते. मात्र, उमेदवारांचा रोष आणि निष्पक्षतेचा विचार करता, अखेर उच्च न्यायालयाच्या कुलसचिवांनी अधिकृत अधिसूचना काढून १६ ऑगस्टची परीक्षा रद्द केल्याचे जाहीर केले. नवी टायपिंग परीक्षा कधी आणि कुठे होणार, याबाबतची सविस्तर माहिती आणि वेळापत्रक लवकरच मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध केले जाईल. त्यामुळे उमेदवारांनी अधिकृत अपडेट्ससाठी उच्च न्यायालयाच्या वेबसाईटवर लक्ष ठेवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

टायपिंग परीक्षेत किमान १० गुण मिळवणे अनिवार्य असून, त्यात अपयशी ठरल्यास उमेदवारांना प्रक्रियेतून थेट बाहेर पडावे लागते. यामुळे उमेदवारांचे भवितव्य धोक्यात आले होते. संतापलेल्या उमेदवारांनी परीक्षा केंद्रांबाहेर ठिय्या आंदोलन करत परीक्षा रद्द करून ती पुन्हा घेण्याची जोरदार मागणी केली होती. राजकीय नेते आणि सामाजिक कार्यकर्त्यांनीही या मागणीला पाठिंबा दिला होता.

## भरधाव ट्रक थेट बसस्थानकातील हॉटेलमध्ये घुसून भीषण अपघात



सातारा : (स. गांवकरी)

सातारा-लोणंद या सतत मोठ्या गर्दीच्या राज्यमार्गावर सोमवारी पहाटेच्या सुमारास एक अत्यंत थरारक आणि भीषण अपघात घडला. लोणंदच्या दिशेने साताऱ्याकडे जाणाऱ्या एका अनियंत्रित आणि भरधाव ट्रकने थेट देऊर येथील एसटी बसस्थानकातील उपाहारगृहाला (हॉटेल) जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत उपाहारगृहाचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. मात्र, सुदैवाने हॉटेलमधील तरुण या अपघातात बालंबाल वाचल्याने मोठा अनर्थ आणि जीवितहानी टळली आहे.

देऊर हे महत्त्वाचे केंद्र असून परिसरात प्रसिद्ध देवस्थान, शाळा आणि महाविद्यालये असल्याने या बसस्थानकावर दिवसभर प्रवाशांची आणि विद्यार्थ्यांची प्रचंड गर्दी असते. सुदैवाने अपघात पहाटेच्या सुमारास घडल्यामुळे मोठी जीवितहानी टळली. जर हा अपघात दिवसा घडला असता, तर अनेक निष्पाप जीवांना आपला जीव गमवावा लागला असता, अशी भीती प्रत्यक्षदर्शींनी व्यक्त केली आहे. प्रशासनाने या मागण्यांची दखल न घेतल्यास लवकरच तीव्र स्वरूपाचा 'रास्ता रोको' आंदोलन छेडण्याचा इशारा देऊर ग्रामस्थांनी दिला आहे. या अपघाताची नोंद वाठार स्टेशन पोलीस ठाण्यात झाली आहे. या मार्गावर सातत्याने होणारे अपघात रोखण्यासाठी प्रशासनाने तत्काळ उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी आता जोर धरू लागली आहे.

### ग्रामस्थांच्या मुख्य मागण्या

- देऊर बसस्थानक परिसरात तत्काळ गतीरोधक (स्पीड ब्रेकर) उभारणे.
- देऊर ग्रामस्थांचा 'रास्ता रोको'चा इशारा; गतीरोधक आणि सिग्नल यंत्रणा बसवण्याची आक्रमक मागणी केली आहे
- स्पीड कॅमेरे आणि सिग्नल यंत्रणा त्वरित बसवणे.

## जलवाहतुक सेवेबाबत मेरीटाईम बोर्डाचा महत्त्वाचा निर्णय

अलिबाग : (स. गांवकरी)

मांडवा ते गेटवे ऑफ इंडिया दरम्यानची फेरीबोट जलवाहतूक सेवा १ सप्टेंबरपासून सुरु करण्यास मेरीटाईम बोर्डाने अनुमती दिली आहे. मुंबईला जोडणारा हा सर्वांत जवळचा आणि वेळेची बचत करणारा मार्ग असून वर्षातील तीन महिने ही सेवा बंद असते, त्याचा परिणाम येथील पर्यटन व्यवसायावर जाणवत असतो. त्यामुळे फेरीबोट सेवा कधी सुरु होणार याकडे येथील प्रवाशांसह पर्यटन व्यावसायिकांचे लक्ष असते. हा मार्ग खुला होत असल्याने मुंबईतील पर्यटकांचा ओघ अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन स्थळांकडे वाढणार आहे. नऊ महिने अलिबाग मांडवा ते गेट वे ऑफ इंडीया, गेट वे ऑफ इंडीया ते अलिबाग मांडवा असा प्रवास बोटीने प्रवास करणाऱ्यांची संख्या पंधरा लाखाच्या आसपास आहे. या जलमार्गावरून पीएनपी, मालदार, अजंठा,



अपोलो या कंपन्यांच्या प्रवासी बोटी सुरू असतात. दर अर्ध्यातासाने एक फेरीबोट मांडवा बंदरातून सुटते. गर्दीच्या वेळेला ही सरासरी वाढवली जाते. स्पीडबोट, रो-रो पेक्षा फेरीबोटीचा प्रवास सर्वसामान्यांना परवडणारा आहे. त्याचबरोबर रस्त्यावरील खड्डे, प्रदुषण, वाहतुक कोंडी यापासून सुटकाराम्हणून विशेषतः अलिबाग आणि मुरुड तालुक्यातील प्रवासी मुंबई-गोवा महामार्गावरुन किंवा इतरमार्गाने मुंबईला जाण्यापेक्षा अलिबाग,मुरुड मधील प्रवासी फेरीबोटीचा वापर जास्तीत जास्त करतात.

## निष्क्रिय, बुळ्या आणि कचखाऊ समाजाची मला चीड

### ध्वनी प्रदूषण ही समस्या यायलाच नको होती : विद्यानंद बापट यांचं मत

पुणे : (स. गांवकरी)

गणेशोत्सव २०२६ च्या पूर्वतयारीसाठी पुणे महानगरपालिकेत डीजे आणि कर्णकर्कश ध्वनिक्षेपकांविरोधात पुण्यातील सजग नागरीक विद्यानंद बापट यांनी आवाज उठवला. ते त्यांच्या पद्धतीने प्रामाणिकपणे प्रयत्न करत आहेत आणि लढा देत आहेत. डीजे आणि लाऊडस्पीकरवर पूर्णपणे बंदी घालण्याची त्यांनी मागणी केली आहे. त्यांच्या भूमिकेला विरोध दर्शवला आहे. दरम्यान एका पॉडकास्टला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी बुळ्या, निष्क्रिय समाजाची चिड माझ्या मनात आहे असं विद्यानंद बापट यांनी म्हटलं आहे. निष्क्रिय, बुळ्या किंवा कचखाऊ समाजाची चिड माझ्या मनात आहे. ध्वनी प्रदूषणाचा मुद्दा बघा. पुण्यासारख्या आणि इतर शहरांमध्ये ध्वनी प्रदूषण हे कळसाला पोहचलं आहे. सण-उत्सवांच्या हास्यास्पद सवयी या शहरांनी लावून घेतल्या आहेत. मला त्याचा



त्रास होतो आहे पण मला एकट्याला त्रास होतोय का? वैयक्तिक आवड-निवड नाही. अनेक लोकांना याचा त्रास होतो आहे. पण ते या ध्वनी प्रदूषणाच्या विरोधात आवाज उठवायलाच कचरत आहेत. त्यांनाच मी बोटचेपे आणि कचखाऊ म्हणतोय. पुणे म्हणजे सांस्कृतिक राजधानी वगैरे म्हणत टेंभा मिरवणारे हेच लोक आहेत. ग्राफिटीचे टी शर्ट घालतात जाज्वल्य अभिमान म्हणजे पुणे वगैरे. अशा लोकांची, अशा समाजाची मला चिड आहे. आज सोलापूरसारखं अर्धग्रामीण शहर बघा. नरसय्या अडाम तिथे निवडून जायचे. ते विडी कामगारांचे नेते होते. पुण्याचे तुमचे टेंभे काय तर सहज दगड मारला तरी विद्वानच माणूस सापडेल. टेंभे मिरवणाऱ्यांमध्ये आणि समस्यांशी झगडणाऱ्यांमध्ये हा विरोधाभास आढळतो. हे ब्लॅक आणि ते व्हाईट असं असलं पाहिजे होतं. मला वाटतं की हा प्रश्न तर आधीच सुटायला हवा होता. किंबहुना इथे ही समस्या असायलाच नको होती. त्यामुळे माझ्या मनात चिड आहे. कुणीच मूर्ख त्याविरोधात आवाज उठवत नाहीये, त्यामुळे माझ्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि मी त्याच प्रामाणिकपणे लढा देतो आहे असं विद्यानंद बापट यांनी म्हटलं आहे. डिजिटल चावडी या पॉडकास्टला दिलेल्या मुलाखतीत विद्यानंद बापट यांनी हे विधान केलं आहे. जे तुमचे विचार आहेत त्या सगळ्याचं एकत्रित करुन पक्ष किंवा संघटना उभं करणं असं काही तुमच्या मनात आहे का? असं विचारलं असता, राजकारणात जाण्याचा किंवा असं काही सुरु करण्याचा विचार नाही. कारण लोकशाहीसाठी एक महत्त्वाचं असतं ते म्हणजे नागरिकांचं सक्रिय असणं, ते नसेल तर समाजात लोकशाही जरी संवैधानिक दृष्ट्या असेल, तरीही ती ऑटोक्रसी होऊन जाते. माझी संकल्पना अमेरिकन सिटिझन ॲक्टिव्हिझम मधून प्रेरित आहे. कारण तिथे ही संकल्पना कळसाला पोहचली आहे. आपल्याकडे मला तरी असं वाटतं की फक्त कागदोपत्रीच लोकशाही आहे. अशा टेक्निकली डेमोक्रसी असलेल्या देशांमध्ये राज्यकर्ते राजासारखे वागायला लागतात त्यामुळे मग ती लोकशाही उरत नाही. असं विद्यानंद बापट यांनी म्हटलं आहे. संघटनात्मक स्वरुप द्यायला माझा काही विरोध नाही. मला कसलं श्रेय वगैरे नको आहे कुणी समविचारी लोक एकत्र येऊन माझ्या तत्त्वांना मुरड न घालता जर संघटन होणार असेल तर ते असायला माझी ना नाही. पण माझी अद्याप काही रुपरेखा ठरलेली नाही.

## एक लाख ५६ हजार अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठीचे धडे

### कोमसाप कार्याध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ यांची माहिती

सावंतवाडी : (स. गांवकरी)

महाराष्ट्रात व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला येथील भाषा आणि संस्कृतीची ओळख असणे आवश्यक आहे. या उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभागाच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या अमराठी रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा शिकविण्याच्या उपक्रमात एक लाख ५६ हजार चालकांनी मराठीचे धडे घेतले, अशी माहिती कोकण मराठी साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ यांनी कुडाळ येथे दिली. आज कुडाळ येथे कोकण मराठी साहित्य परिषदेची जिल्हा कार्यकारिणीची बैठक झाली, त्यावेळी डॉ. प्रदीप ढवळ बोलत होते. यावेळी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांसाठीची प्रमाणपत्र आरटीओ अधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आली.

यावेळी बोलताना डॉ. प्रदीप ढवळ म्हणाले, महाराष्ट्र शासनाने १९८९ मध्येच महाराष्ट्रात वाहन चालविण्याचे परमिट घेणाऱ्या अमराठी चालकांना मराठी बोलता येणे बंधनकारक असल्याचा शासन निर्णय घेतला होता. मात्र, गेल्या ३६ वर्षांत या निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी झाली नव्हती. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या विषयात पुढाकार घेतल्यानंतर त्याला मूर्त स्वरूप मिळाले. मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनीही या उपक्रमाला आर्थिक आणि संस्थात्मक पाठबळ दिले. 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी भाषा अभियान' अंतर्गत हा उपक्रम १ मे रोजी सुरू करण्यात आला आणि १५ ऑगस्ट रोजी त्याची सांगता झाली.

कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ या दोन संस्थांवर या अभियानाची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली होती.

महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये कोमसापचे सुमारे १६०० साहित्यिक, प्राध्यापक व कार्यकर्ते अमराठी वाहनचालकांना व्यवहारातील मराठी शिकविण्याच्या कामात सहभागी झाले. अवघड आणि मोठा अभ्यासक्रम न शिकवता केवळ दैनंदिन व्यवहारात उपयोगी पडतील अशी मराठीची वाक्ये शिकविण्यावर भर देण्यात आला. दररोज चार वाक्य याप्रमाणे चालकांना मराठी



बोलण्याचा सराव करून देण्यात आला. रिक्षा, टॅक्सी तसेच ओला, उबेर, रॅपिडोच्या चालकांनीही उत्स्फूर्तपणे या उपक्रमात सहभाग घेतला. मराठी बोलण्याचा न्यूनगंड दूर करून आत्मविश्वासाने मराठी बोलण्यास प्रवृत्त करण्याचे काम कोमसापच्या कार्यकर्त्यांनी केले. प्रशिक्षणानंतर कोमसापचे प्रशिक्षक, साहित्यिक आणि आरटीओ अधिकाऱ्यांनी चालकांची तोंडी परीक्षा घेतली. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या चालकांना प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र देण्यात आले. या परीक्षेत ७ हजार ७५० चालक अपयशी ठरले, मात्र त्यांनी पुन्हा अभ्यास करून परीक्षा देण्याची तयारी दर्शविली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठी शिकण्यासाठी मुदतवाढ दिल्याने आणखी अनेक अमराठी वाहनचालक स्वतःहून पुढे येत असल्याचे डॉ. ढवळ यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी मराठी भाषेत शिक्षण देण्याचा उपक्रमाला सहकार्य केले. ठाणे येथे १७ ऑगस्ट रोजी प्रमाणपत्र वितरणाचा मोठा कार्यक्रम झाला. त्याचवेळी राज्यातील सुमारे ५० आरटीओ विभागांमध्ये उत्तीर्ण चालकांना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अमराठी रिक्षा व टॅक्सी चालकांना देण्यात येणारी प्रमाणपत्रेही आरटीओ अधिकाऱ्यांकडे सुपूर्त करण्यात आली आहेत."नियम केवळ कागदावर असतात; मात्र त्यांची पूर्तता करताना मानवतेच्या दृष्टिकोनातून भाषा शिकविणे गरजेचे होते. साहित्यिकांचे कार्य केवळ कविता, कथा किंवा कादंबरी लेखनापुरते मर्यादित न राहता समाजासाठी काही करण्याची संधी या उपक्रमातून मिळाली.

## सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या जागा घटणार

पुणे : (स. गांवकरी)

राज्यातील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमधील डॉक्टरांच्या आणि प्राध्यापकांच्या एकूण मंजूर जागांमध्ये कपात करण्याचा निर्णय राज्य सरकारच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने घेतला आहे. राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या नव्या नियमांचे कारण देऊन सरकारने 'प्रतिबंधात्मक व सामाजिक औषधशास्त्र' या महत्त्वाच्या विभागाचा सुधारित आकृतिबंध जाहीर केला आहे. २५ ऑगस्ट २०२६ रोजी या संदर्भातील आदेश देण्यात आला आहे. या निर्णयामुळे राज्यातील सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांमधील प्राध्यापकांची संख्या पूर्वीपेक्षा कमी होणार असून, २७ पदे कायमची रद्द होणार आहेत. वैद्यकीय शिक्षण विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाने वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार शिक्षकांची संख्या निश्चित केली आहे. राज्यातील काही जुन्या महाविद्यालयांमध्ये नियमांपेक्षा जास्त पदे मंजूर होती, तर काही नवीन महाविद्यालयांमध्ये ती कमी होती. त्यामुळे ज्या ठिकाणी नियमांपेक्षा जास्त पदे होती, तेथील जागा रद्द करण्याचा किंवा दुसऱ्या, ज्या ठिकाणी गरज आहे, त्या



महाविद्यालयात हलविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सरकारच्या जुन्या नियमांनुसार या विभागासाठी राज्यात प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि सहाय्यक प्राध्यापकांची एकूण ३०९ पदे मंजूर होती. मात्र, आता नव्या नियमांनुसार ही संख्या २८२ वर आली आहे. एकूण २७ पदे कायमची कमी करण्यात आली आहेत. या निर्णयामुळे राज्यातील प्रमुख वैद्यकीय महाविद्यालयांतील मंजूर पदे कमी होणार आहेत. यामध्ये मुंबईतील ग्रँट मेडिकल कॉलेज (जे. जे. रुग्णालय), पुण्यातील बी. जे. मेडिकल कॉलेज, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर, मिरज, धुळे, लातूर, अलिबाग, सिंधुदुर्ग आणि सातारा येथील वैद्यकीय महाविद्यालयांचा समावेश आहे. अहिल्यानगर आणि नागपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयांना काही पदे वर्ग करून देण्यात आली आहेत.

# गांवकरीच्या मुंबई-कोकण विभागीय कार्यालयाचे उद्घाटन!

**ना मंत्री, ना आमदार, ना खासदार; जन्मदात्या आई-वडिलांच्या शुभहस्ते फीत कापून उद्घाटनाचा अनोखा आदर्श!**





**नवी मुंबई : (स. गांवकरी)**

आजच्या स्पर्धेच्या युगात कोणत्याही कार्यालयाचे, संस्था अथवा व्यवसायाचे उद्घाटन मंत्री, आमदार, खासदार किंवा प्रसिद्ध व्यक्तींच्या हस्ते करण्याची प्रथा रूढ झाली आहे. मात्र या प्रथेला फाटा देत दैनिक समर्थ गांवकरी समूहाच्या मुंबई-कोकण विभागीय कार्यालयाचे उद्घाटन जन्मदात्या आई-वडिलांच्या शुभहस्ते करून एक आगळावेगळा सामाजिक संदेश देण्यात आला. दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या संकल्पनेतून हा अनोखा उपक्रम साकारला. पिताश्री शांताराम रामभाऊ चव्हाण, मातोश्री शैला शांताराम चव्हाण, नवनाथ चव्हाण, भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते मंगेश चव्हाण, रवींद्र चव्हाण... जयसिंग पारखे जालिंदर पारखे. संजय कुटे. जयवंत गुरव पत्रकार राजेश उपाध्याय अब्दुल कलाम शहा. आणि प्रवीण चव्हाण डॉ मनीलाल शिंपी संदीप पाटील यांच्या शुभहस्ते फीत कापून कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. उद्घाटनप्रसंगी फटाक्यांची आतषबाजी करून जल्लोषात कार्यालयाचे स्वागत करण्यात आले.

दैनिक समर्थ गांवकरीने ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत आपला मोठा वाचकवर्ग निर्माण केला असून, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पालघर, रायगड आणि सिंधुदुर्ग या भागांमध्ये पत्रकारितेचा विस्तार करण्यासाठी हे विभागीय संपर्क कार्यालय महत्त्वाचे ठरणार आहे. विशेष म्हणजे उद्घाटनासाठी मंत्री, आमदार, खासदार अथवा सेलिब्रिटींना निमंत्रित न करता सर्वसामान्य वाचक, नागरिक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि हितचिंतकांना प्राधान्य देण्यात आले. ग्रामीण भागातील सामान्य कुटुंबातून उभ्या राहिलेल्या दैनिक समर्थ गांवकरी समूहाने आता मुंबईसारख्या महानगरात पाऊल ठेवत ग्रामीण जनतेच्या प्रश्नांना मुंबईच्या व्यासपीठावरूनही आवाज देण्याचा संकल्प केला आहे. समूहाचे संपादक तथा पालक शेठ नानजीभाई खिमजीभाई ठक्कर ठाणावाला यांच्या मार्गदर्शनाखाली समूहाची वाटचाल अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी भारतीय जनता पक्षाचे घाटकोपर मंडल प्रमुख नवनाथ चव्हाण यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून सर्वसामान्यांचे प्रश्न शासनापर्यंत पोहोचविण्याची गरज व्यक्त केली. ग्रामीण भागातून मुंबईत सुरू झालेले हे कार्यालय निश्चितच चांगला वाचकवर्ग निर्माण करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. चव्हाण परिवाराने सामाजिक क्षेत्रात केलेल्या कार्याचे कौतुक करत त्यांनी ही सामाजिक बांधिलकी पुढेही कायम राहावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. दिवसभर मुंबई व कोकण विभागातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, वाचक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि हितचिंतकांनी कार्यालयास भेट देऊन संपादक दशरथ चव्हाण यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सौभाग्यवती चव्हाण ताई यांचे योगदान, वाचकांचा विश्वास आणि सर्वसामान्य जनतेचे प्रेम हीच समूहाची खरी ताकद असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. सौ अस्मिता चव्हाण .मंत्रालय संपर्कप्रमुख विष्णु बुरे, पत्रकार राजू मिर .राजेश डोके यांच्यासह अनेक मान्यवरांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. मुंबई-कोकण विभागीय कार्यालयाच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देणारे आणि वाचकांच्या अपेक्षा पूर्ण करणारे हक्काचे व्यासपीठ उभे करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. यावेळी दिवसभरामध्ये राजकीय सामाजिक शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी भेटी देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी कार्यालयामध्ये पूजाअर्चा करून प्रारंभ करण्यात आला सर्वांचे स्वागत चव्हाण परिवाराने केले. सर्व मान्यवरांना पुष्पगुच्छ व महिलांना घरगुती स्वयंपाकाचे आकर्षक वस्तू भेट देण्यात आली.






























## थोडक्यात पण महत्वाचे



## ईद मिलादुन्नबी निमित्त खिर्डी खुर्द येथे वृक्षारोपण

■ ईदगाह व कब्रस्तान परिसरात विविधांगी वृक्षांची लागवड संपन्न !

रावेर (स. गांवकरी) : ईद मिलादुन्नबीच्या पवित्र सणाचे औचित्य साधून खिर्डी खुर्द येथील ईदगाह परिसर व कब्रस्तान येथे पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत मोठ्या उत्साहात वृक्षारोपण कार्यक्रम पार पडला. या सामाजिक उपक्रमादरम्यान विविध रोपांची लागवड करून त्यांच्या संगोपनाचा संकल्प करण्यात आला. या प्रसंगी मस्जिद ए ताजुश्शरीयाचे मुत्वल्ली जाबीर बेग, खिर्डी खुर्द गावचे सरपंच राहुल फालक, माजी सरपंच निळकंठ बढे, विलास पाटील, दुर्गादास बोंडे, ग्रामपंचायत सदस्य अल्ताब बेग, याकुब बेग, जाकीर पिंजारी, सुलतान मण्यार, निजाम पिंजारी, अब्दुल पिंजारी, शेख फारुक, हाजी महेबुब बेग, शेख नईम,शेख कय्युम, शेख सादिक, सद्दाम बेग, मुश्ताक पिंजारी, जहांगीर पिंजारी, मुख्तार पिंजारी व नूरमोहम्मद पिंजारी यांच्यासह गावातील नागरिक व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुंबई-नाशिक महामार्गावर पडघा येथे मद्यधुंद कंटेनर चालकाचा धुमाकूळ



भिवंडी (स. गांवकरी) : मुंबई-नाशिक महामार्गावरील पडघा येथील एम.ई.सीबी पॉवर हाऊस गेटसमोर मद्यधुंद अवस्थेत कंटेनर चालवणाऱ्या चालकाने दुचाकीला जोरदार धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात दुचाकीवरील दोघांसह कंटेनर चालक जखमी झाला असून, तिघांनाही उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सदर अपघाताच्या गुन्ह्याची नोंद पडघा पोलीस स्टेशन मध्ये करण्यात आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित कंटेनर नाशिकहून मुंबईच्या दिशेने जात होता. पडघा परिसरात चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कंटेनरने दुचाकीला धडक दिली. या धडकेत दुचाकीवरील दोघे जखमी झाले. कंटेनर उत्तर प्रदेश राज्यातील असून, चालकाचे नाव अमित पाठक असल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पंकज गिरी यांनी पोलिसांसह घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांच्या तत्परतेमुळे महामार्गावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यात आली. दरम्यान, मुंबई -नाशिक महामार्गावर सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून बसविण्यात आलेल्या ब्रेकरमुळे वाहनांचा वेग कमी झाला होता. त्यामुळे मोठी दुर्घटना टळल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले. महामार्गावर अवजड वाहने चालवताना चालकांनी मद्यपान करून वाहन चालवू नये, तसेच वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. विशेषतः दुचाकीस्वारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या घटनेचा अधिक तपास पडघा पोलीस करीत आहेत.

## शेतकऱ्यांच्या उसाला ५००० हजार रुपये पेक्षा जास्त भाव देणार : चेअरमन

भिवंडी (स. गांवकरी) : साखरेचे बाजार भाव असेच वाढत राहावा अशी अपेक्षा आहे . साखरेचे बाजारभाव वाढले की , शेतकऱ्यांना ५००० हजार रुपये पेक्षा भाव देण्यास परवडणार आहे असे श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना चेअरमन सत्यशील शेरकर यांनी कार्यक्रमाप्रसंगी सांगितले . चेअरमन सत्यशील शेरकर पुढे म्हणाले की , आमचा शेतकरी सदन आहे .श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना कमी दिवसात जास्त उत्पादन करणार आहे . त्यामुळे शेतकऱ्यांना जास्त पैसे देणार आहे. बाजारात साखर नाही, त्यामुळे बाजारभाव वाढते आहे . महाराष्ट्रात ७०% जवळपास कारखान्यात साखर संपली आहे .सगळीकडे साखरेचा तोटा ,जोपर्यंत साखर बाजारात येत नाही ,तोपर्यंत साखरेचे बाजारभाव कमी होणार नाही . केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार यांनी कारखाने तपासले आहेत. एकही साखर पोते व्यापाराकडे व कारखाना गोडाऊनकडे शिल्लक राहणार नाही याची जबाबदारी सरकारने घेतली आहे. सरकार कारखाना गोडाऊनकडे साखर किती शिल्लक याबाबत पत्र व्यवहार सुरू आहे . यामुळे साखरेचे बाजार भाव वाढले की , उसाला बाजार भाव वाढणार असे चेअरमन शेरकर यांनी सांगितले.

## एकल महिलानी एकल महिला सर्वेक्षण नोंदणी गरजेची : मुख्याधिकारी

शिवनेरी (स. गांवकरी) : महाराष्ट्र शासन महिला व बालकल्याण विकास विभाग मंत्रालय मुंबई यांच्या सूचनेनुसार एकच महिला सर्वेक्षण कार्यक्रम जुन्नर नगरपरिषद येथे राबविण्यात येत आहे यासाठी एकल महिला सर्वेक्षण कार्यक्रमात नोंदणी करण्याचे आव्हान मुख्याधिकारी चरण कोल्हे यांनी केले आहे. जुन्नर नगर परिषद क्षेत्रातील विधवा घटस्फोटीत परित्यक्ता अविवाहित निराधार व इतर एकर महिलांची ओळख व नोंदणी महत्त्वाची आहे .

# वसंत भांगे यांच्या १३व्या स्मृतिदिनानिमित्त शालेय साहित्य वाटप

### ग्रामीण विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटीने शिक्षण घेण्याचे आवाहन





अक्कलकोट : (स. गांवकरी)

बुध्दवासी वसंत अंबाजी भांगे यांच्या १३व्या स्मृतिदिनानिमित्त जिल्हा परिषद शाळा तसेच दोन अंगणवाडीतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. अपर पोलीस अधीक्षक विजय कवाडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. या उपक्रमातून ग्रामीण व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्र टाकणे होते. कार्यक्रमाची सुरुवात बुध्दवासी वसंत अंबाजी भांगे यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे आयोजक व लोकशाही न्यूजचे पत्रकार चंद्रशेखर भांगे, झी २४ तासचे श्री. नितीन पाटणकर, साम टीव्हीचे श्री. विद्याभूषण लिमये, प्रख्यात विधीज्ञ श्री. निलेश लंके, गोगावचे उपसरपंच व पत्रकार कमलाकर सोनकांबळे, राजेंद्र उणदे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रवी हुळगणे, सिद्धा सोनकांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना अपर पोलीस अधीक्षक विजय कवाडे म्हणाले की, आई-वडील आणि शिक्षक यांच्या संस्कारातून विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला योग्य दिशा मिळते.

या संस्कारांच्या बळावरच विद्यार्थी भविष्यात गरुडझेप घेऊ शकतो. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी परिस्थितीवर मात करून जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर अभ्यास करावा. आपल्या आई-वडिलांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी शिक्षणाला सर्वाधिक प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, आपल्या गावातील गरीब कुटुंबातून आलेले चंद्रशेखर भांगे यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांचा संघर्ष आणि यश हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असून, गावासाठी ही निश्चितच कौतुकाची बाब आहे. वसंत भांगे यांच्या स्मृतिदिनानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्याचा उपक्रम राबवून त्यांच्या स्मृतींना सामाजिक उपक्रमातून अभिवादन करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे हा समाजातील प्रत्येक घटकाने शिक्षणाला हातभार लावण्याचा सकारात्मक संदेश देणारा उपक्रम असल्याचे उपस्थित मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन साहेबलाल सुभेदार यांनी केले, तर आभार प्रदर्शन महादेव सोनकवडे यांनी केले. कार्यक्रमास असलम सुभेदार , शंकर घुमते, असलम मुल्ला यासह शिक्षक, अंगणवाडी सेविका, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, विद्यार्थी, पालक तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीगोंद्यात येथे ईद-ए-मिलादच्या निमित्ताने भव्य मिरवणूक



श्रीगोंदा तालुका : (स. गांवकरी)

ईद-ए-मिलादुन्नबी म्हणजेच पैगंबर मोहम्मद यांच्या जयंतीचे औचित्य साधून श्रीगोंदा शहरात मोठ्या उत्साहात आणि धार्मिक वातावरणात भव्य शोभायात्रा (जुलूस) काढण्यात आला, बुधवार दिनांक २६ ऑगस्ट रोजी निघालेल्या या मिरवणुकीत शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या मंगल प्रसंगी आमदार विक्रम पाचपुते यांच्या मातोश्री डॉ. प्रतिभाताई पाचपुते यांनी उपस्थित राहून मुस्लिम बांधवांना ईद-ए-मिलादुन्नबीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी श्रीगोंदा नगरपरिषद नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष प्रतिनिधी, आजी-माजी नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते व पोलीस प्रशासनाच्यावतीने शुभेच्छा देण्यात आल्या. या वेळी मुस्लिम समाजाच्या वतीने प्रमुख उपस्थित मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. श्रीगोंद्यातील कुरेशी मोहल्ला येथून या भव्य शोभायात्रेला मुख्य सुरुवात झाली. यानंतर ही मिरवणूक शहरातील झेंडा चौक, संत रोहिदास चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, शनिचौक शेख महंमद बाबा दर्गाह पटांगण, दिल्ली वेस मार्गे जुलुस काढण्यात आला. मिरवणुकीच्या संपूर्ण मार्गावर नागरिकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

सर्व प्रमुख चौकांमध्ये मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले असून अत्यंत शांततेत, शिस्तबद्धतेत आणि उत्साही वातावरणात हा जुलूस पार पडला. या मिरवणुकीत अंजुमन जमेतुल कुरेशी जमात, शेरे सुलतान यंग ग्रुप, टिपू सुलतान यंग सर्कल, लबैक या हुसेन ग्रुप, राजबक्ष सोशल ग्रुप आणि इतर सहभागी झाले होते.

## करुणा, प्रेम आणि सह-अस्तित्वाच्या भावनेतून ८० जणांचे रक्तदान



जुन्नर : (स. गांवकरी)

करुणा, प्रेम आणि सह-अस्तित्वाची भावना जेव्हा मानवी जीवनात जागृत होते, तेव्हा व्यक्ती स्वतःच्या स्वार्थाच्या पलीकडे जाऊन संपूर्ण मानवजातीच्या कल्याणाचे प्रभावी माध्यम बनते. निरंकारी सद्गुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या प्रेरणेतून परोपकार, करुणा आणि मानवसेवेच्या उदात्त भावनेने संत निरंकारी मिशन तर्फे ३० ऑगस्ट २०२६ रोजी जुन्नर येथे संत निरंकारी सत्संग भवन मध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ८० युनिट रक्ताचे संकलन करण्यात आले. वाय सी एम रुग्णालय रक्तपेढीच्या अनुभवी डॉक्टर व त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तदात्यांची आवश्यक वैद्यकीय तपासणी करून सुरक्षित, शिस्तबद्ध पद्धतीने रक्तदान प्रक्रिया पूर्ण केली. संपूर्ण आयोजनामध्ये स्वच्छता, सुरक्षितता, नियोजन आणि सेवाभाव यांना विशेष प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे हा उपक्रम केवळ रक्तदानापुरता मर्यादित न राहता मानवता, करुणा आणि सामाजिक उत्तरदायित्वाचे प्रेरणादायी उदाहरण ठरला. शिबिराचे उद्‌घाटन जुन्नर नगरपरिषदेच्या सौ सुजाताताई काजळे व पुणे जिल्हा परिषद सदस्य श्री गुलाबराव पारखे यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी आळेफाटा संयोजकिय क्षेत्राचे संयोजक श्री चंद्रकांत कुऱ्हाडेजी याचबरोबर अनेक नगरसेवक, सामाजिक कार्यकर्ते व मान्यवरांनी शिबिरास सदिच्छा भेट देऊन संत निरंकारी मिशनच्या समाजोपयोगी कार्याचे मनापासून कौतुक केले.

विशेष म्हणजे, संत निरंकारी मिशनची रक्तदानाची ही पवित्र सेवा-परंपरा गेल्या चार दशकांहून अधिक काळ अखंडपणे सुरू आहे. आतापर्यंत देशभरात होणाऱ्या रक्तदान शिबिरांच्या माध्यमातून सुमारे १५,००,००० पेक्षा जास्त युनिट रक्त संकलित करण्यात आले असून, मानवसेवेसाठी मिशनची अटळ बांधिलकी यामधून अधोरेखित होते.

युगप्रवर्तक बाबा गुरबचन सिंह जी यांनी सत्य, साधेपणा आणि सद्भावनेचा मार्ग दाखवत तरुणांना नशामुक्त जीवनाचा स्वीकार करून आपली शक्ती समाजसेवेसाठी अर्पण करण्याचे आवाहन केले. त्यानंतर बाबा हरदेव सिंह जी महाराज यांनी "रक्त नाड्यांतून वाहावे, नाल्यांतून नव्हे" हा प्रेरणादायी संदेश देत रक्तदानाला जनआंदोलनाचे स्वरूप दिले. हाच मानवसेवेचा संदेश आजही सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभावीपणे पुढे नेला जात आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व मान्यवर, रक्तदाते, स्वयंसेवक, वैद्यकीय अधिकारी तसेच या उपक्रमाच्या आयोजनासाठी प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या सहकार्य करणाऱ्या सर्वांचे श्री. लक्षण डाके (सर) यांनी मनःपूर्वक आभार मानले.

### साडेदहा लाखांच्या मुद्देमालासह प्रतिबंधित विमल पानमसाला व गुटखा जप्त; एका आरोपीला अटक !

## सावदा पोलिसांची मोठी कारवाई



रावेर : (स. गांवकरी)

तालुक्यातील सावदा पोलिसांनी महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या सुगंधित तंबाखू, विमल पानमसाला आणि गुटख्याची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्या एका आरोपीला सावदा पोलिसांनी रंगेहात पकडले आहे. या कारवाईत पोलिसांनी गुटखा आणि वाहतुकीसाठी वापरलेली कार असा एकूण १०,२७,७००/- रुपये (दहा लाख सत्तावीस हजार सातशे रुपये) किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

घटनेची सविस्तर माहिती दिनांक २७/०८/२०२६ रोजी रात्री २२:५० वाजण्याच्या सुमारास सावदा पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की, एका राखाडी (ग्रे) रंगाच्या होंडा अमेझ कारमधून (क्र. MH-19-CV-4445) प्रतिबंधित गुटखा चोरटी वाहतूक करून तांदलवाडी फाट्यावरून जाणार आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी तांदलवाडी फाट्याजवळ सापळा रचला.रात्री २३:०४ वाजता संशयित कार येताना दिसताच पोलिसांनी ती थांबवून तपासणी केली.

कारचालक सारंग मुरलीधर अवचार (वय ३१, रा. अकलूद, ता. यावल, जि. जळगाव) याच्याकडे चौकशी केली असता, त्याने कारमध्ये प्रतिबंधित गुटखा असल्याचे कबूल केले. पोलिसांनी दोन खाजगी पंचांसमक्ष कारची झडती घेतली असता, त्यात मोठ्या प्रमाणात विमल पानमसाला, केशरयुक्त पानमसाला आणि तंबाखूचे पाकीट आढळून आले.

जप्त केलेला मुद्देमाल: १) विमल पानमसाला आणि तंबाखूचे वेगवेगळे पाकीट (एकूण किंमत: ५,२७,७००/- रुपये) २) गुटख्याची वाहतूक करण्यासाठी वापरलेली होंडा अमेझ कार (किंमत: ५,००,०००/- रुपये) एकूण जप्त मुद्देमाल: १०,२७,७००/- रुपये आरोपीची कबुली व गुन्हा दाखल:

आरोपीने हा प्रतिबंधित माल मध्यप्रदेशातील बुऱ्हाणपूर येथील एका व्यापाऱ्याकडून भुसावळ आणि वरणगाव परिसरात किरकोळ विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली आहे. याप्रकरणी सावदा पोलीस स्टेशनमध्ये FIR No. 0222/2026 अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS), २०२३ च्या कलम १२३, २७४, २७५, १०६, २२३ आणि अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ चे कलम २६(२)(i), २६(२)(iv), ३०(२)(a), ५९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित, उपविभागीय पोलीस अधिकारी नंदराज पाटील यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश फड, पोलीस उपनिरीक्षक राहुल सानप, पोहेका/४६८ निलेश बाविस्कर,........ अशांनी यशस्वीरीत्या पार पाडली असून पुढील तपास पो. उ. नि. राहुल सानप हे करत आहेत.

## शाळांच्या दारात पोहोचले आमदार पाचपुते



■ विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी 'ऑन द स्पॉट' पाहणी

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

विद्यार्थ्यांच्या शिक्षणात अडथळा ठरणाऱ्या समस्या शोधून त्या जागेवरच समजून घेण्यासाठी आमदार विक्रमसिंह पाचपुते यांनी शाळा भेट दौऱ्याच्या माध्यमातून थेट शाळेच्या दारात पोहोचत पाहणी सुरू केली आहे. श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघातील शाळांची शैक्षणिक आणि भौतिक स्थिती प्रत्यक्ष जाणून घेत आवश्यक सुविधांसाठी ठोस पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने हा दौरा महत्त्वपूर्ण ठरत आहे. या दौऱ्यांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नारायण आश्रम येथे आमदार पाचपुते यांनी प्रत्यक्ष भेट देत शाळेतील शैक्षणिक वातावरण, मूलभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींची पाहणी केली. यावेळी शिक्षकांशी सविस्तर संवाद साधून शाळेसमोरील प्रश्न, आवश्यक सुविधा आणि प्राधान्याने करावयाच्या कामांची माहिती घेतली. केवळ कागदोपत्री अहवालांवर अवलंबून न राहता 'शाळेत चला, समस्या समजून घ्या आणि उपाययोजना करा' या भूमिकेतून आमदार पाचपुते यांनी विद्यार्थ्यांशीही मनमोकळा संवाद साधला. त्यांच्या अडचणी, अपेक्षा आणि शाळेबाबतच्या गरजा जाणून घेत विद्यार्थ्यांना सुरक्षित, दर्जेदार आणि सुविधायुक्त शैक्षणिक वातावरण देण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजनांचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. शिक्षणाच्या पायाभूत सुविधांना बळ देणे म्हणजे विद्यार्थ्यांच्या भविष्याला दिशा देणे, या भूमिकेतून मतदारसंघातील शाळांचा प्रत्यक्ष आढावा घेतला जात आहे.

# एकनाथ खडसेंच्या अमृत महोत्सव सोहळ्यात सर्वपक्षीय दिग्गजांची मांदियाळी

### शरद पवारांकडून खडसेंच्या भाजप विस्तारातील योगदानाचे कौतुक; नाथाभाऊंनी जुन्या राजकीय आठवणींना दिला उजाळा !





रावेर : (स. गांवकरी)

ज्येष्ठ नेते तथा माजी महसूल मंत्री आमदार एकनाथराव खडसे यांच्या ७५व्या वर्षात पदार्पणानिमित्त मुक्ताईनगर तालुक्यातील कोथळी येथे आयोजित अमृत महोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. विशेष म्हणजे, या सोहळ्याला राजकीय मतभेद बाजूला ठेवून सर्वपक्षीय दिग्गज नेत्यांची उपस्थिती लाभली. त्यामुळे हा कार्यक्रम राजकीय वर्तुळात विशेष चर्चेचा विषय ठरला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरदचंद्र पवार होते. केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले, केंद्रीय आरोग्य कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव,केंद्रीय क्रीडा राज्यमंत्री रक्षाताई खडसे, अमृत महोत्सव समितीचे अध्यक्ष तथा माजी विधानसभा अध्यक्ष अरुण भाई गुजराती,राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते जयंत पाटील, माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील, शेकापचे अध्यक्ष जयंत पाटील, रासपचे अध्यक्ष महादेवराव जानकर, राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे माजी मंत्री बाळासाहेब थोरात, अनिल देशमुख, हर्षवर्धन पाटील, राजेश टोपे, राजेंद्र शिंगणे, गुलाबराव देवकर दिलीप कांबळे, दिंडोरी खासदार भास्कर भगरे,पंढरपूरचे आमदार अभिजित पाटील, आमदार किशोर दराडे, माजी आमदार रमेश दादा चौधरी शिरीष दादा चौधरी दिलीप मोरे कैलास पाटील डॉ. बी. एस. पाटील, जैन उद्योग समूहाचे अध्यक्ष अशोक जैन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रमोद पाटील, कैलास पाटील,प्रसेन्नजीत पाटील, रोहिणी ताई खडसे ,मंदाताई खडसे, यांच्यासह विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि मान्यवरांची आणि खडसे परिवारातील सदस्य यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित सर्व प्रमुख पाहुण्यांचे खडसे परिवार आणि लोकनेते एकनाथराव खडसे अमृत महोत्सव समितीतर्फे संत मुक्ताईची प्रतिमा, शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते आमदार एकनाथराव खडसे यांचा सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी मनोगत व्यक्त करताना माजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी उत्तर महाराष्ट्रात भाजपचा विस्तार करण्यासाठी नाथाभाऊंनी अविरत मेहनत घेतल्याचे सांगितले. विधानसभेत त्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणातून विरोधी पक्षनेता म्हणून सक्षमपणे काम कसे करायचे, हे त्यांनी कृतीतून दाखवून दिले. उत्तर महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी अनेक अशक्य वाटणाऱ्या सिंचन योजना पूर्णत्वास नेल्या. संपूर्ण महाराष्ट्रात माणसे जोडणाऱ्या नाथाभाऊंनी ज्या पक्षात काम केले, तेथे निष्ठेने योगदान दिले. पुढे राजकीय मतभेद झाल्यानंतर त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. नाथाभाऊंसारखा लोकनेता पुन्हा होणे शक्य नाही, असे गौरवोद्गार जयंत पाटील यांनी काढले. माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनीही एकनाथ खडसे यांच्या नेतृत्वाचा आणि संघर्षाचा गौरव केला. नाथाभाऊ हे सरकारवर जोरदार हल्ला चढवणारे आक्रमक आणि संघर्षशील नेते असून महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीला त्यांचा परिचय आहे, असे ते म्हणाले. १९९० मध्ये दोघेही प्रथमच विधानसभेत एकत्र निवडून आल्याची आठवण त्यांनी सांगितली. आपण विधानसभेचे अध्यक्ष असताना खडसे विरोधी पक्षनेते म्हणून अतिशय आक्रमकपणे जनतेचे प्रश्न मांडत असत, असेही वळसे पाटील यांनी नमूद केले. रक्षा खडसे आणि रोहिणी खडसे पुन्हा समाजकार्यात सक्रिय झाल्याचा उल्लेख करत त्यांनी नाथाभाऊंनी शरद पवार यांचा आदर्श समोर ठेवावा आणि त्यांच्या मनातील सर्व इच्छा-आकांक्षा पूर्ण व्हाव्यात.

# प्रेरणा पतसंस्थेची 34 वर्षांची वाटचाल ठेवीदार कर्जदार व संचालक मंडळा वरिल विश्वासामुळेच - सभापती अरुण साहेब तनपुरे

राहुरी : (स. गांवकरी)

संस्था चालवताना आपण विश्वस्त आहोत , आर्थिक शिस्त व ठेवीदार कर्जदारांच्या विश्वासावर संस्था चालते . प्रेरणा पतसंस्थेने ठेवीदार कर्जदारांचा विश्वासाला पात्र ठरल्याने गेल्या ३४ वर्षांपासून संस्थेची प्रेरणादायी वाटचाल असल्याचे गौरवोद्गार राहुरी बाजार समिती सभापती व डॉ . तनपुरे कारखान्याचे अध्यक्ष अरुण साहेब तनपुरे यांनी काढले .गुहा येथे प्रेरणा पतसंस्थेची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा सभासदांच्या व मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडली . यावेळी अध्यक्षस्थानावरून श्री तनपुरे बोलत होते . तनपुरे म्हणाले की , पूर्वी बँका कर्ज देत नसल्याने शेतकरी सावकाराच्या दारात जाऊन भरडला जायचा . नंतरच्या काळात सहकाराची सुरुवात झाली . पतसंस्था चळवळीच्या माध्यमातून शेतकरी , मजूर , उद्योजकांना कर्ज उपलब्ध होत असल्याने शेतकऱ्यांसह सहकार चळवळीची देखील प्रगती झाली . प्रेरणा पतसंस्थेच्या माध्यमातून संस्थापक अध्यक्ष सुरेश शेठ वाबळे व त्यांचे सहकारी संचालक मंडळ, कर्मचारी, अधिकारी यांनी ठेवीदार कर्जदारांच्या विश्वासाला तडा जाऊ न देता आपली संस्था मानून चांगली काम सुरू ठेवले आहे .



प्रेरणा पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश शेठ वाबळे यांनी आपल्या भाषणात संस्थेची माहिती सांगताना म्हटले की , संस्थेचे ३४ हजार ५०० खातेदार असून संस्थेची वार्षिक उलाढाल १ हजार कोटी रूपये आहे . संस्थेच्या ठेवी १४७ कोटी ५४ लाख रुपये इतक्या आहेत . कर्ज वाटप ९३ कोटी रुपये गुंतवणूक ५८ कोटी रुपये असून संस्थेचे खेळते भांडवल १६१ कोटी रुपये इतके आहे . निधी १० कोटी रुपये इतका आहे त्यांनी सांगितले . २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त सोने तारण कर्ज वितरित केल्याची ही त्यांनी सांगितले . सातत्याने ११ % डिव्हिडंड सभासदांना देत असून संस्थेचे सर्व शाखांमध्ये आरटीजीएस सुविधा , मोबाईल बँकिंग , सभासद कर्जदार मेसेज सेवा असे अत्याधुनिक यंत्रणा सुरू असून काळाच्या बरोबरीने व्यवस्थित सातत्याने संस्थेने बदल केले आहेत . संस्थेच्या गुहा , वांबोरी ,आंबी , म्हैसगाव , राहुरी , श्रीरामपूर , वांबोरी , देवळाली प्रवरा अशा शाखांमधील ठेवींमध्ये सातत्याने वाढ होत आहे . आधुनिक तंत्रज्ञानाचा संस्थेने स्वीकार केल्याचे श्री वाबळे यांनी सांगितले . कोणत्याही संस्थेची गुणवत्ता पाहूनच गुंतवणूक करावी . ठेवीदारांनी व्याजाच्या मोहात बळी पडू नये . गुंतवणूक करताना आर्थिक साक्षरता देखील महत्त्वाची असल्याचेही श्री वाबळे यावेळी म्हणाले . ४ मार्च १९९३ या दिवशी संस्थेची स्थापना झाल्यानंतर हजारो कुटुंबांना आधार देण्याचे काम केले . प्रेरणा पतसंस्था ही ठेविदार कर्जदारांचा त्यागावर व विश्वास व उभी राहिल्याचे वाबळे यांनी सांगितले . यावेळी एमपीएससी स्पर्धेत उत्तीर्ण झालेले अभिषेक थेटे , कृषी विद्यापीठाच्या उद्यान विद्याप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल प्रा संजय कोळसे भंडारा जिल्हा पणन पदी संभाजी चंद्रे यांचा तर प्रेरणा पतसंस्थेच्या प्रारंभी रुजू झालेले अधिकारी कर्मचारी श्री गोरक्षनाथ चंद्रे , संजय माळवदे , मच्छिंद्र वर्पे व दत्तात्रय शिंदे यांचा तनपुरे कारखान्याचे अध्यक्ष अरुण तनपुरे यांच्या हस्ते सत्कार व सन्मान करण्यात आला.

यावेळी आदर्श पतसंस्थेचे मा . चेअरमन शिवाजी कपाळे, मा चेअरमन अण्णासाहेब चोथे, चेअरमन सुधाकर कदम सर , व्हा . चेअरमन आबासाहेब वाळुंज, राहुरी नगरपालिकेचे नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे सर, द्वारकानाथ बडदे , पवार , भाऊसाहेब गाडे ,, वसंतराव कोळसे , अँड जगन्नाथ डौले , दिलीप शर्मा , नंदू शेठ भराडिया , रघुनाथ हिवाळे , नंदकुमार दिघेसर , सोपानराव नरसाळे , बाबासाहेब मुसमाडे , दत्तात्रेय गाडे , संजय कवडे , बाबासाहेब गागरे , सोपानर शेलार सर, रवींद्र राऊत , , प्रदीप गरड , सुमित उन्हे , .प्रेरणा मल्टिस्टेट चेअरमन सुजित वाबळे , सिद्धार्थ वाबळे, संस्थेचे व्हा.चेअरणण वसंचालक ठेवीदारसभासद संस्थेचे अधिकारी कर्मचारी वृंद आदी उपस्थित होते . प्रा . विशाल वाबळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले . सूत्रसंचालन पत्रकार गणेश हापसे यांनी तर आभार प्रा . वेणूनाथ लांबे यांनी केले .

## थोडक्यात बातम्या...

### चेअरमनपदी बाळासाहेब मुंगसे पाटील



आळंदी (स. गांवकरी) : विश्वकर्मा संरक्षण कामगार सहकारी पतसंस्था मर्यादित पुणे या संस्थेचे चेअरमन पदी बाळासाहेब मुंगसे यांची बिनविरोध निवड झाली आहे. या निवडीचे निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून श्रीमती नूतन भोसले यांनी कामकाज पाहिले. या संस्थेत एकूण २१ संचालक व दोन तज्ञ संचालक असे २३ मान्यवरांचे मंडळ आहे. चेअरमन पदी बाळासाहेब मुंगसे पाटील यांची बिनविरोध निवड झाल्याची घोषणा निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती नूतन भोसले यांनी केली. निवडी नंतर मुंगसे पाटील यांच्या निवडीचे जोरदार स्वागत करून अभिनंदनाचा वर्षाव तसेच संस्थे तर्फे सत्कार करण्यात आला. आळंदी, केळगाव पंचक्रोशीतील विविध संस्था, पदाधिकारी यांचे तर्फे अभिनंदन करण्यात आले. आळंदी SDV10 ग्रुप तर्फे अर्जुन मेदनकर यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.



### मोबाईलमध्ये न गुंतता मैदानी खेळांना महत्त्व द्या : मीनाताई मुनोत

राहुरी (स. गांवकरी) : वांबोरी येथील अ. ए. सोसायटीच्या महेश मुनोत माध्यमिक विद्यालयात विद्यालयाचे माजी चेअरमन कै. वसंतलालजी मुथा यांच्या स्मृतिदिनानिमित्त प्रतिमापूजन, अभिवादन व गुणवंत विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. विठ्ठलदासजी झंवर होते. प्रमुख अतिथी म्हणून नगर मर्चंट्स बँकेच्या माजी चेअरमन तथा संचालिका श्रीमती मीनाताई मुनोत उपस्थित होत्या. आनंदऋषीजी म.सा. जयंतीनिमित्त आयोजित निबंध स्पर्धेत सहभागी झालेल्या 100 विद्यार्थिनींचाही यावेळी गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना श्रीमती मीनाताई मुनोत म्हणाल्या की, विद्यार्थ्यांनी मोबाईलमध्ये अधिक वेळ न गुंतता मैदानी खेळ व शारीरिक श्रमांना महत्त्व द्यावे. महिलांनी स्वतःला कधीही कमजोर समजू नये. मुले व मुली हे समाजरूपी रथाची दोन चाके असून, विद्यार्थ्यांनी योग्य ध्येय निश्चित करून ते साध्य करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत. राहुरी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. ऋषिकेश मोरे यांनी कै. वसंतलालजी मुथा हे उत्कृष्ट विधिज्ञ, शिस्तप्रिय व कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व होते, असे सांगून विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनातील चांगले गुण आत्मसात करावेत, असे आवाहन केले. कार्यक्रमास हेमंतभाऊ मुथा,बबलुशेठ मुथा, ॲड. तात्यासाहेब डोळसे, ॲड. ऋषिकेश मोरे, प्राचार्या शुभांगी देशपांडे, उपप्राचार्या वनिता बोऱ्हाडे, पर्यवेक्षक सुधाकर वाबळे, अ. ए. सोसायटी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका मीना पवार यांच्यासह शिक्षकवृंद उपस्थित होते. प्रास्ताविक राम पालवे यांनी केले. मान्यवरांचा परिचय हर्षल कुलकर्णी यांनी करून दिला, तर कै. वसंतलालजी मुथा यांच्या जीवनकार्याचा परिचय बाळासाहेब नवले यांनी करून दिला. सूत्रसंचालन अनिकेत पाठक यांनी केले, तर आभार संभाजी पवार यांनी मानले.



### 'साई आदर्श' परिवाराची घोडदौड- महंत उद्धव महाराज मंडलिक

राहुरी (स. गांवकरी) : संघटन कौशल्य हे कोणत्याही संस्थेच्या यशासाठी महत्त्वाचे असून अध्यात्मिक तसेच आर्थिक क्षेत्रात शिस्त पाळणे गरजेचे आहे. चांगले काम करणाऱ्याच्या पाठीमागे समाजातील सर्वजण ठामपणे उभे राहतात. याच धर्तीवर साई आदर्श परिवाराची सुरू असलेली यशस्वी वाटचाल कौतुकास्पद असून संस्थेची अशीच उत्तरोत्तर प्रगती होत राहावी, असे गौरवोद्गार वरद विनायक सेवा धामचे ह.भ.प. उद्धव महाराज मंडलिक यांनी काढले. राहुरी येथील साई आदर्श मल्टीस्टेटने २०० कोटी रुपयांच्या ठेवींचा महत्त्वपूर्ण टप्पा पार केल्याबद्दल संस्थेच्या मुख्य कार्यालयात ठेवीदारांचा आभार व आनंद सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, ठेवीदार, संस्थेचे अधिकारी-कर्मचारी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. तनपुरे कारखान्याचे चेअरमन अरुण तनपुरे म्हणाले की, १२ वर्षांच्या अथक मेहनतीच्या जोरावर साई आदर्शची घोडदौड आज २०० कोटी रुपयांच्या ठेवींपर्यंत येऊन पोहोचली आहे. संस्थेचे चेअरमन शिवाजी कपाळे यांच्या नेतृत्वाबरोबरच त्यांच्या परिवारातील सदस्य आणि सर्व कर्मचारी यांनी घेतलेली मेहनत मोलाची आहे. संस्थेने मिळवलेले हे यश कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले. माजी आमदार चंद्रशेखर कदम म्हणाले की, कर्तृत्वाच्या जोरावर मोठी झालेली माणसे नेहमीच मोठी होत असतात. साई आदर्शने विश्वास, पारदर्शकता आणि सातत्यपूर्ण कामाच्या जोरावर मोठी झेप घेतली आहे. संस्थेची अशीच अधिकाधिक प्रगती व्हावी आणि २०० कोटींच्या ठेवींचा टप्पा लवकरच ५०० कोटी रुपयांवर पोहोचावा, अशी अपेक्षा व्यक्त करून त्यांनी संस्थेला शुभेच्छा दिल्या.

# खासदार सुप्रिया सुळे यांनी घेतले पवित्र शिवलिंगाचे दर्शन



भीमाशंकर : (स. गांवकरी)

श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र भीमाशंकर येथे भाविकांची मोठी गर्दी होत असताना खासदार सुप्रिया सुळे यांनी रविवार ता. ३० रोजी भीमाशंकर ज्योतिर्लिंगाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांनी पवित्र शिवलिंगावर जलाभिषेक करून भगवान शंकराची मनोभावे पूजा-अर्चा केली.

यावेळी मंदिरातील धार्मिक विधींमध्ये सहभागी होत त्यांनी शिवलिंगाचे दर्शन घेतले. मंदिर परिसरात उपस्थित भाविकांनीही दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. सुळे यांच्या दर्शनावेळी मंदिर प्रशासन व उपस्थित कार्यकर्त्यांकडून आवश्यक व्यवस्था करण्यात आली.

"गेली चार-पाच दशके माझी आई भीमाशंकर येथे दर्शनासाठी येत होती. गेल्या दोन-तीन वर्षांपासून तिच्या वयोमानामुळे तिला येणे शक्य होत नसल्याने आता तिच्याऐवजी मी दर्शनासाठी येत आहे. भीमाशंकर हे श्रद्धेचे प्रचंड मोठे स्थान असून, ही परंपरा मी पुढे नेणार आहे," अशी भावना खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली. भीमाशंकर येथे झालेल्या विकासकामांचा संदर्भ देताना सुळे म्हणाल्या, "विकासकामांमुळे मंदिर बरेच दिवस भाविकांसाठी दर्शनास बंद ठेवण्यात आले होते. त्यामुळे या वर्षी परिस्थिती सुधारली असेल, अशी अपेक्षा होती. मात्र, तसे काही झाले नाही. उलट भाविकांची गैरसोय वाढल्याचे चित्र पाहायला मिळत आहे." "भीमाशंकर हे लाखो भाविकांच्या श्रद्धेचे स्थान आहे. त्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांना सुरक्षितता, आवश्यक सोयी-सुविधा आणि सुलभ दर्शन मिळाले पाहिजे," अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

यावेळी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पुणे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम, तालुका युवक अध्यक्ष विशाल वाबळे तसेच कार्यकर्ते, देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी व पुजारी तसेच भाविक भक्त उपस्थित होते.

# ह.भ.प. निवृत्ती रामभाऊ बिबवे यांचे निधन

अकोले : (स. गांवकरी)



अकोले तालुक्यातील कळस बुद्रुक येथील वारकरी क्षेत्रातील ह.भ. प. निवृत्ती रामभाऊ बिबवे (वय 82)यांचे शनिवार दिनांक 22 ऑगस्ट 2026 रोजी दुपारी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पच्छात पत्नी, दोन मुले, दोन मुली, सुना,सहा भाऊ, भावजय,पुतणे, पुतण्या,नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर प्रवरातीरी कळसेश्वर मंदिरा मागील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी मोठा जनसमुदाय उपस्थित होता. कळस येथील अखंड हरीनाम सप्ताह व अन्य अध्यात्मिक कार्यामध्ये त्यांचे मोठे योगदान होते.त्यांच्या निधनाने वारकरी क्षेत्रातील ज्येष्ठ व्यक्तिमत्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. प्रगतीशील शेतकरी शरद व स्टेट बँकेचे विमा सल्लागार भारत बिबवे, श्रीमती स्वाती रमेश आरोटे, सौ. सुनिता गुलाब सहाणे यांचे ते वडील होत. तर प्रगतीशील शेतकरी यादव, निवृत्त माध्य. शिक्षक मधुकर, निवृत्त प्राचार्य गोविंद,प्रगतीशील शेतकरी गणपत,अगस्ती कारखान्याचे निवृत्त अधिकारी संपत व निवृत्त मुख्याध्यापक शिवाजी बिबवे यांचे ते ज्येष्ठ बंधू होत.

# घोळसगावमध्ये १२४ घरकुले मंजूर

सर्वसामान्यांच्या 'हक्काच्या घराचे' स्वप्न साकार होण्याच्या दिशेने मोठे पाऊल



सोलापूर : (स. गांवकरी)

घोळसगाव येथील सर्वसामान्य नागरिकांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला असून, प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत तब्बल 124 घरकुलांना मंजुरी मिळाली आहे. स्वतःचे पक्के घर असावे,हे अनेक कुटुंबांचे दीर्घकाळापासूनचे स्वप्न असून या मंजुरीमुळे ते स्वप्न प्रत्यक्षात उतरविण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल पडले आहे. घरकुलाचा लाभ हा केवळ शासकीय योजनेचा लाभ नसून,सर्वसामान्य व गरजू नागरिकाला सन्मानाने जगण्याचा आणि स्वतःच्या हक्काच्या घरात राहण्याचा अधिकार आहे.घोळसगावातील पात्र लाभार्थ्यांना हा हक्क मिळावा यासाठी स्थानिक पातळीवर सातत्याने प्रयत्न करण्यात आले. या प्रक्रियेत अक्कलकोटचे आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांचे सहकार्य,तसेच पंचायत समितीचे उपसभापती सागरदादा कल्याणशेट्टी यांची साथ महत्त्वाची ठरली. त्याचबरोबर गावातील घरकुलांच्या प्रश्नासाठी सरपंच राजशेखर कीवडे यांनी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा यामुळे 124 घरकुलांच्या मंजुरीचा मार्ग सुकर झाले आहे. गावातील पात्र व गरजू कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी पुढील काळातही आवश्यक ते सहकार्य केले जाईल,अशी भूमिका स्थानिक पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी व्यक्त केली आहे. घोळसगावातील पात्र लाभार्थ्यांच्या घराचे स्वप्न आता प्रत्यक्षात साकार होण्याच्या दिशेने वाटचाल करत असून,या निर्णयामुळे गावातील सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# जवानांच्या मनगटावर राखी; राष्ट्रसेवेला माणुसकीचा मानाचा मुजरा!

सबला उत्कर्ष फाउंडेशनचा अनोखा रक्षाबंधन सोहळा; एनसीसी जवानांना राखी बांधून मिठाईचे वाटप

छत्रपती संभाजीनगर (स. गांवकरी)

देशाच्या रक्षणासाठी सदैव तत्पर असलेल्या जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करत सबला उत्कर्ष फाउंडेशन, पडेगाव यांच्या वतीने रक्षाबंधन दिनानिमित्त एनसीसी जवानांना राखी बांधून व मिठाई खाऊ घालत अनोख्या पद्धतीने रक्षाबंधन साजरे करण्यात आले. मीरा नगर, पडेगाव येथे झालेल्या या उपक्रमातून राष्ट्रसेवेला सलाम करत जवानांप्रती असलेले प्रेम, आदर आणि कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्यात आली. २८ ऑगस्ट २०२६ रोजी रक्षाबंधनाच्या शुभमुहूर्तावर सबला उत्कर्ष फाउंडेशनच्या अध्यक्षा श्रीमती राजश्री राहुल चौधरी यांच्या नेतृत्वाखाली महिला सदस्यांनी ५० MH, ५-१-५७, NCC भवन, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर येथे उपस्थित राहून एनसीसी जवानांच्या मनगटावर प्रेमाने राखी बांधली. यावेळी सुभेदार मेजर गिरीशचंद्र साहिब, नायब सुभेदार उमेद साहिब, माजी सुभेदार बशीर साहिब, माजी सुभेदार इंगळे साहिब, माजी हवालदार गणेश ढेपळे साहिब तसेच लिपिक मयूर कुलकर्णी यांना राखी बांधून मिठाईचे वाटप



करण्यात आले. उपस्थित जवानांना रक्षाबंधनाच्या मनःपूर्वक शुभेच्छाही देण्यात आल्या. या उपक्रमात आरती रवीश परदेशी, आरती रितेश परदेशी, श्रद्धा अमित परदेशी, कशिश कुमार, सिमरन चौधरी यांच्यासह सबला उत्कर्ष फाउंडेशनच्या महिला सदस्यांची उपस्थिती होती. देशाच्या सीमांचे आणि नागरिकांचे रक्षण करण्यासाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या जवानांसोबत रक्षाबंधन साजरे करण्यामागे केवळ सणाचा उत्साह नसून राष्ट्रसेवकांप्रती आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा सामाजिक संदेश असल्याचे फाउंडेशनच्या वतीने सांगण्यात आले. यावेळी जवान तसेच एडीएम ऑफिसर लेफ्टनंट कर्नल कीर्ती मॅडम यांच्याशी महिला सदस्यांनी संवाद साधला. राष्ट्रसेवेसाठी जवान देत असलेल्या योगदानाला त्यांनी मनापासून सलाम केला.

"देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांसोबत रक्षाबंधन साजरे करणे हा आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. जवानांच्या मनगटावर बांधलेली ही राखी त्यांच्या देशसेवेला आमचा मानाचा मुजरा आहे," अशी भावना सबला उत्कर्ष फाउंडेशनच्या अध्यक्षा तथा सबला उत्कर्ष वृत्तपत्र दिल्ली व महाराष्ट्राच्या मुख्य संपादक श्रीमती राजश्री राहुल चौधरी यांनी व्यक्त केली. रक्षाबंधन कार्यक्रमादरम्यान लेफ्टनंट कर्नल कीर्ती मॅडम यांच्यासोबत सबला उत्कर्ष फाउंडेशनच्या आगामी वृक्षारोपण उपक्रमाबाबतही चर्चा करण्यात आली. फाउंडेशनच्या वतीने यापूर्वी १० जांभळाची, ५ आंब्याची आणि १० बदामाची झाडे जपवणूक करण्यात आली असून, आगामी काळात आणखी वृक्षारोपण करण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. "एक पेड देश के नाम—एक झाड लावा, प्रदूषण वाचवा, सुंदर शहर-सुंदर वसुंधरा" तसेच "एक झाड, एक मूल—दोन्ही फुले वाचवा" या संकल्पनेतून सैनिकांच्या उपस्थितीत विशेष वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्याबाबतही यावेळी सकारात्मक चर्चा झाली.

# नारायणगावची 'बहुचर्चित' ग्रामसभा संपन्न !

नारायणगाव : (स. गांवकरी)



नारायणगाव ग्रामपंचायतीच्या वतीने काल मुक्ताई मंगल कार्यालय येथे ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित या ग्रामसभेत शेकडो नागरिकांनी उपस्थिती लावत प्रथमच कोरम पूर्ण करण्यात यश मिळवले. सुरुवातीला उपसरपंच बाबू पाटे यांची सर्वानुमते सभेच्या अध्यक्षस्थानी निवड करण्यात आली. स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व पिंपळवंडी येथील दुर्दैवी घटनेत मृत्युमुखी पडलेल्या चिमुकलीस श्रद्धांजली वाहून ग्रामसभेची सुरुवात झाली. नागरिकांनी प्रत्येक वार्डनिहाय विकास कामे सुचविली तसेच आपल्या समस्या मांडल्या. त्यात प्रामुख्याने गावात सर्वत्रच झालेली रस्त्यांची दुर्दशा हा विषय चर्चिला गेला.खराब रस्त्यांमुळे वारंवार अपघात होत असून,पडल्यामुळे ज्येष्ठांना दुखापती होत असल्याची बाब नागरिकांनी निदर्शनास आणली. त्याचबरोबर सांडपाण्याची दुरावस्था,ओपन जिम मधील अस्वच्छता, पथदिव्यांची वाणवा, स्मशानभूमीचे पार्किंग, गावात सर्वत्र झालेले अतिक्रमण तसेच इतरही अनेक विषयांवर चर्चा झाली. या सर्व बाबतीत वेगवान कारवाई करून लवकरात लवकर चांगले रस्ते निर्माण करण्याचा प्रयत्न करू असे यावेळी चर्चेस उत्तर देताना अध्यक्ष बाबू पाटे यांनी सांगितले. ग्रामपंचायत सदस्य हेमंत कोल्हे यांनी ग्रामपंचायतीने यापूर्वीच मार्गी लावलेल्या विविध कामांची माहिती दिली. सभेचे सचिव मच्छिंद्र जगताप यांनी मागील सभेचा वृत्तांत वाचून कायम केला व विषयवारपणे ग्रामसभा चालविली. माजी सरपंच अशोक पाटे, माजी उपसरपंच पुष्पा खैरे, माजी जिल्हा परिषद सदस्य राजश्री बोरकर, विद्यमान जिल्हा परिषद सदस्या नेहा पाटे, संतोष वाजगे, निलेश रसाळ, रामदास अभंग,नामदेव अण्णा खैरे, विकास तोडकरी, गणेश वाव्हळ, आशिष माळवदकर, इजाज आतार, सोपान खैरे, मुकेश वाजगे, अजित वाजगे,रमेश मेहेत्रे, राजेंद्र माताडे आदी ग्रामस्थांनी चर्चेत सहभाग घेतला.महापुरुषांच्या पुतळ्यांसंदर्भात गणेश वाव्हळ यांनी प्रश्न उपस्थित करून तेथे स्वच्छता व सुशोभीकरण करण्याची मागणी केली, तर रमेश मेहेत्रे यांनी नारायणगावच्या भूमिकन्या विठाबाई भाऊ मांग नारायणगावकर यांच्या स्मारकाचा प्रश्न उपस्थित केला. कनिका खैरे यांनी ग्रामपंचायतीच्या सर्व जमाखर्चाची माहिती मागितली यावेळी ग्रामसभेत थोडा गदारोळ झाला मात्र विघ्नहर कारखान्याचे माजी संचालक संतोष खैरे व नारायणगावचे पोलीस उपनिरीक्षक जगदीश पाटील यांनी वेळीच हस्तक्षेप करत पुढील अनुचित प्रकार टाळला. नारायणगावच्या सरपंच डॉ.शुभदा वाव्हळ यांच्या मार्गदर्शनाखाली तंटामुक्ती समितीची निवड करण्यात आली.युवा नेते सुजित खैरे यांनी किशोर खैरे यांचे नाव अध्यक्षपदासाठी सुचविले त्यास अजित वाजगे यांनी अनुमोदन दिले. उपाध्यक्ष पदासाठी सागर दरंदाळे यांचे नाव नामदेव अण्णा खैरे यांनी सुचविले, तर रामदास अभंग यांनी सचिव पदासाठी एड. राजेंद्र कोल्हे यांचे नाव सुचविले. तीनही पदाधिकाऱ्यांची सर्वसंमतीने निवड होऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. तमाशा क्षेत्रातील दिग्गज कलावंत रघुवीर खेडकर यांना 'पद्मश्री' पुरस्कार तर विठाबाईंच्या कन्या मालती इनामदार यांना 'कला गौरव'पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनचा ठराव मंजूर करण्यात आला. ग्रामसभेमध्ये विविध विषयांवर साधक बाधक चर्चा होऊन पुढील विकास कामांची दिशा ठरविण्यात आली. नारायणगाव पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक जगदीश पाटील यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. ग्रामपंचायत सदस्य गणेश पाटे व हेमंत कोल्हे यांनी सभेचे सूत्रसंचालन केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)